| | |
|---|---|
| **MHPA100000652022** | **मो.अ.नु.भ.अर्ज क्र. २/२०२२**<br>**पल्लवी हरीभाउ उर्फ कृष्णा नीळे .... अर्जदार.**<br>**विरुध्द**<br>**महाराष्ट्र स्टेट रोड ट्रान्सपोर्ट कार्पोरेशन ... सामनेवाले** |

**निशाणी क्र. ५ वरील हुकूम**

१. प्रस्तुतचा अर्ज हा दिनांक ०९.०९.२०२१ रोजी झालेल्या मोटार वाहन अपघातात हरीभाउ उर्फ कृष्णा पि. भागाजी उर्फ भागवत निळे यांच्या झालेल्या मृत्यू प्रकरणी मोटार वाहन कायदा कलम १४० नुसार अंतरिम नुकसान भरपाई मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जदारांनी असे कथन केले आहे की, मयत हे मृत्यूसमयी २३ वर्षांचे होते. दि.०९.०९.२०२१ रोजी सायंकाळी ४.३० वाजता मयत हरीभाउ उर्फ कृष्णा हे त्यांच्या मामाची भेट घेवून मौजे माळेवाडी येथून मौजे बनपिंपळा येथे जाण्यासाठी त्यांची मोटारसायकल क्र. एम.एच.—२२—एआर—८५६९ ने माळेवाडी बाजुकडुन मौजे बनपिंपळा बाजुकडे जात असतांना गंगाखेड ते पालम रोडवर आर.के.गार्डन व मंगल कार्यालय येथे रात्री ७.३० वाजेच्या सुमारास वाहतुकीचे नियमांचे पालन करीत जात असतांना अचानक एस. टी. बस क्रमांक एमएच—२०—डी—९८७८ च्या चालकाने रस्त्याचे परिस्थीतीचा विचार न करता हलगर्जी व निष्काळजीपणे अति वेगात चालविली आणि हैवा टीप्पला ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात, सदर बस एकदम चुकीच्या बाजुने घेतली व मोटारसायकल क्र. एम.एच.—२२—एआर—८५६९ हीस जोरदार ठोस मारली व अपघात झाला. सदर अपघातात मोटारसायकल चालक हरीभाउ उर्फ कृष्णा पि. भागाजी उर्फ भागवत हे रोडवर पडून गंभीर जखमी झाले. अपघातानंतर त्यांना उपजिल्हा रूग्णालय, गंगाखेड येथे उपचार करणे कामी नेण्यात आले, परंतु हरीभाउ उर्फ कृष्णा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी तपासाअंती घोषीत केले. त्यानंतर संबंधीत डॉक्टरांनी मयताचे शवविच्छेदन केले आणि अपघाताची माहिती

पोलीसांना दिली. फिर्यादीने बस चालकाच्या विरूध्द फिर्याद दिली. सदर अपघात हा एस.टी.बस क्रमांक एमएच—२०—डी—९८७८ च्या चालकाच्या चुकीमुळे झाला आहे. सामनेवाला हे सदर वाहनाचे चालक व मालक आहेत.

३. सामनेवाला महाराष्ट्र स्टेट रोड ट्रान्सपोर्ट कार्पोरेशन यांनी मुळ अर्ज आणि अंतरिम नुकसान भरपाईच्या अर्जास जबाब दाखल केलेला असुन तो निशाणी क्र.१० वर आहे. सामनेवाला यांनी अर्जातील कथने नाकारलेली आहेत. सामनेवाला हे असे कथन करतात की, अपघात हा मोटारसायकल चालकाच्या म्हणजे मयताच्या चुकीमुळे झालेला आहे. सदर अपघातास मयतच जबाबदार आहेत. त्यामुळे सामनेवाला हे नुकसान भरपाईची रक्कम देणे लागत नाही. सामनेवाला यांनी अर्जात नमुद केलेले मयताचे वय, धंदा व उत्पन्न नाकारलेले आहे. सामनेवाला असे कथन करतात की, सदर अपघात हा मयताच्या हलगर्जी व निष्काळजीपणामुळे झाला आहे. त्यामुळे सामनेवाला हे अर्ज नांमजुर करावा अशी मागणी करतात.

४. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद व्ही.सी. वर ऐकला. तसेच कागदपत्रांची पाहणी केली. अभिलेखावरील पोलीस पेपर, फिर्याद, घ टनास्थळ पंचनामा, मरणोत्तर पंचनामा, पोस्टमॉर्टेम नोटस यावरुन असे दिसुन येते की, दिनांक ०९.०९.२०२१ रोजी झालेल्या मोटार वाहन अपघातात मयत हरीभाउ उर्फ कृष्णा पि.भागोजी उर्फ भागवत निळे यांचा अपघातात झालेल्या जखमांमुळे मृत्यू झाला आहे.

५. अर्जदार यांनी अर्जाच्या पुष्ठयर्थ नि.क्र.४ सोबत पोलीस पेपर, फिर्याद, घटनास्थळ पंचनामा, मरणोत्तर पंचनामा, पोस्टमॉर्टेम नोटस, बसचालकाचे बॅच नंबर, वाहन चालवण्याचा परवाना असे कागदपत्र दाखल केले आहेत.

६. मोटार वाहन कायदा कलम १९८८ चे उपकलम २ कलम

१४० नुसार मृत्यू झाल्यास अंतरिम नुकसान भरपाईची रक्कम ही रूपये ५०,०००/— अशी ठरविलेली आहे. तसेच कलम १४० चे उपकलम ३ नुसार अर्जदार यांना सदरहु अपघात हा कोणाच्या चुकीच्या कृतीमुळे, निष्काळजीपणामुळे व वाहन चालकच्या कमतरतेमुळे झाला याबद्‌दल कथन करून ते शाबीत करण्याची जबाबदारी नाही. वरील सर्व बाबींचा तसेच या केस मधील घटनांचा मोटार वाहन कायदा कलम १९८८ चे कलम १४० प्रमाणे विचार करता मी या मतास आलो आहे की, अर्जदार यांना वरील अर्जात नमुद केलेल्या अपघातात हरीभाउ उर्फ कृष्णा पि. भागोजी उर्फ भागवत निळे यांच्या मृत्यू प्रकरणी अंतरिम नुकसान भरपाई रक्कम रूपये ५०,०००/— मिळण्यास पात्र आहे. सबब, मी खालील आदेश निर्गमित करतो.

## आदेश

१. अर्ज निशाणी क्र.५ मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाले यांनी अंतरिम नुकसान भरपाई पोटी रक्कम रूपये ५०,०००/— (अक्षरी रूपये पन्नास हजार मात्र) ही अर्जदार क्र.१ ते ३ यांना आजपासुन एक महिन्याचे आत दयावी.

३. सामनेवाला यांनी वरील अंतरिम नुकसान भरपाईची रक्कम वरील नमुद केलेल्या कालावधीत न भरल्यास आदेशाचे तारखेपासुन ते रक्कम पुर्ण वसुल होईपर्यंत त्यावर वार्षिक ६ टक्केप्रमाणे व्याज मिळण्यास अर्जदार पात्र राहतील.

४. वरील अंतरिम नुकसान भरपाईची रक्कम भरल्यानंतर ती अर्जदार यांना एन.ई.एफ.टी.द्वारे त्यांचे बॅक खात्यात अदा करण्यात यावी.

Digitally signed by DINESH DATTATRAYA KURULKAR
Date: 2023.07.15 16:25:17 +0530

**( डी. डी. कुरूलकर )**
**सदस्य,**
**मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,**
**गंगाखेड, जि.परभणी.**

**दि.१५.०७.२०२३.**